# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

## P.R.O. Office, Palghar

**Phone No. 02525-297032, Mob No.8669604078**
**Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)**
**E-mail : propalghar@gmail.com**


## प्रेसनोट दि.२१/०६/२०१८

### पोलीस कल्याण सप्ताह व जागतिक योग दिवस चे अनुषंगाने सातपाटी पोलीस ठाणे येथे व्यायाम शाळेचे उद्घाटन केलेबाबत

जागतिक योग दिनाचे अनुषंगाने आज सातपाटी पोलीस ठाणे येथे सकाळी ०८.०० ते ०९.०० वाजेपावेतो पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री.मानसिंग पाटील सहा.पोलीस निरीक्षक यांनी पोलीस ठाणे नेमणुकीतील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना योगासने बाबत योग्य ते मार्गदर्शन करुन **योग दिवस साजरा** केलेला आहे.

पालघर पोलीस दल आयोजित पोलीस कल्याण सप्ताह २०१८ चे अनुषंगाने सातपाटी पोलीस ठाणे येथे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे शारीरीक तंदुरुस्तीकरीता व्यायाम शाळा बांधण्यात आले असुन सदरची व्यायाम शाळा बांधणी करीता सातपाटी पोलीस ठाण्यास हददीतील माहीम-बिडको औदयोगिक वसाहत मधील विविध कंपन्यांचे सहकार्य तसेच इतर दानशुर संस्थान कडुन मिळालेले सहकार्याने उभी करण्यात आले असुन आज रोजी ११.०० वाजता **'' सातपाटी पोलीस ठाणे व्यायाम शाळा ''** उद्घाटन **मा.श्री.मंजुनाथ सिंगे, पोलीस अधीक्षक, पालघर** यांचे शुभहस्ते करण्यात आले. सदर वेळी **प्रमुख अतिथी म्हणुन मा.श्री.योगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.भागलराम बिजानीया, मॅनेजर, एवायएम लि. माहीम, श्री.रायचंद शहा, मालक, सुंदरम कंपनी, माहीम,** हे उपस्थित होते. तसेच पालघर पोलीस उप विभागातील सर्व प्रभारी अधिकारी, महीला दक्षता समिती सदस्य, प्रतिष्ठीत व्यक्ती, राजकीय पदाधिकारी, सरपंच, पोलीस मित्र, स्थानिक ग्रामस्थ, पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यक्रमाकरीता आवर्जून उपस्थिती होते.

तदनंतर १२.०० ते १६.०० वाजेपर्यत सातपाटी पोलीस ठाणे येथे ''अमरज्योत प्रतिष्ठान'' **हेल्थ केअर आणि आय केअर सेंटर** यांचे वतीने नेमणुकीतील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे करीता **मधुमेह, बी.एम.आय.बॉडी फॅट, आहार सल्ला, डोळे तपासणी, रक्तदान, नाडी परीक्षण, प्रकृती परीक्षण, मोतीबिंदु तपासणी ई.सी.जी, अशी** संपुर्ण शरीराची मोफत वैदयकीय तपासणी कॅम्प चे आयोजन करण्यात आलेली होती.